आतील पानात वाचा

- विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा
- जलसंधारण चळवळ ग्रामविकासासाठी आवश्यक : आ. काशिनाथ दाते
- पारनेर तालुक्यात तातडीने चारा छावण्या सुरू करा...

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित

कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर


मा.खा.रावसाहेब पाटील दानवे
(अध्यक्ष)
(माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)


मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे
(सचिव)
(छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)


मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे
(भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)

BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु

श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२३ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## अखेर उद्धव ठाकरेंचे ६ फुटीर खासदार शिंदेसेनेत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** ठाकरेसेनेच्या ६ फुटीर खासदारांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ६ खासदार ांचा पक्षप्रवेश संपन्न झाला. यावेळी शिंदेसेनेचे अन्य आमदार, मंत्री आणि खासदार उपस्थित होते. कट्टर शिवसैनिक खऱ्या शिवसेनेत सहभागी झाले याचा आनंद होत असल्याचं शिंदे यावेळी म्हणाले.

खासदार ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर, संजय जाधव, संजय दिना पाटील, संजय देशमुख या सहा खासदारांनी आज शिंदेसेनेत प्रवेश केला. 'आमच्या पक्षात आता ट्रिपल संजय सहभागी झाले आहेत. त्यांच्यापुढे बाकीच्या संजयची काय गिनती,' असं म्हणत शिंदे यांनी शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांना चिमटा काढला. पण आपल्या पक्षात आणखीही संजय आहेत हे लक्षात येताच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आमच्या पक्षात आणखीही संजय आहेत. त्यांच्यासाठी माझं विधान नव्हतं, असं म्हणत सुधारणा केली.

२२ जून २०२२ रोजी आम्ही उठाव केला. त्यावेळी माझ्या सोबत ४० आमदार होते. आका पुन्हा एकदा चौकार नव्हे, तर षटकार मारल्याचं शिंदे म्हणाले. २०२२ मध्ये शिवसेना वाचवण्यासाठी, धनुष्यबाण वाचवण्यासाठी, बाळासाहेबांचे विचार वाचवण्यासाठी उठाव केला होता. आता शिवसेना वाढवण्यासाठी उठावाचा दुसरा टप्पा सुरू झाल्याचं सूचक विधान त्यांनी केलं. त्यामुळे भविष्यात ऑपरेशन टायगरचे आणखी एपिसोड दिसण्याची दाट शक्यता आहे.



बाळासाहेबांच्या विचारांसाठी, हिंदुत्त्वासाठी आपला लढा सुरू आहे आणि तो पुढेही सुरूच राहील. जिथे शिवसेनेचे विचार असतात, तिथेच शिवसैनिकदेखील असतो. त्यामुळेच या ६ खासदारांनी खऱ्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. शिवसेना परिवारात मी त्यांचं स्वागत करतो, असं शिंदे म्हणाले.

अनेकांनी सहा खासदारांवर आरोप केले. ते पक्ष सोडून जाणार असल्याचं कळत उलटसुलट चर्चा झाल्या. पण ते स्वार्थासाठी शिवसेनेत आलेले नाहीत. त्यांची मतदारसंघांमधील कामं, प्रकल्प मार्गी लागावेत यासाठी त्यांनी शिवसेनेत येण्याचा निर्णय घेतला. यापुढे मी आणि शिवसेना कायम त्यांच्याशी पाठीशी असेल. शिवसेना हा शब्दाला जागणारा पक्ष आहे, असं शिंदे यांनी म्हटलं.

## चंद्रपूर शहर जलमय !
### पहिल्याच पावसात चंद्रपूर मनपाचं 'पितळ उघडं'

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** बऱ्याच दिवसाच्या प्रतिक्षेनंतर अखेर चंद्रपूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात वरुणराजाने जोरदार हजेरी लावली आहे. पहिल्याच पावसाने हवामानात गारवा आणला असला, तरी चंद्रपूर महानगरपालिकेच्या पावसाळापूर्व तयारीचे पुरते 'पितळ' उघडे पडले आहे. पहिल्याच दमदार पावसात चंद्रपूर शहर जलमय झाले असून, महापालिकेच्या दाव्यांचा पुरता फज्जा उडाला आहे.









चंद्रपूर शहरातील मुख्य रस्ते आणि चौकांना पहिल्याच पावसात तळ्याचे स्वरुप आले. शहरातील मुख्य मानला जाणारा श्री टॉकीज चौक, एसबीआय बँक परिसर, पटेल शाळा, एलटीव्ही शाळा परिसर आणि तुकुम भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने रस्ते जलमय झाले आणि याचा थेट फटका वाहनधारकांना तसेच स्थानिक नागरिकांना बसला. अनेक ठिकाणी दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्याचे नुकसान झाले. तर वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मनपाने कोट्यावधी रुपये खर्च करुन नेमकी कोणती पावसाळापूर्व कामे केली? असा संतप्त सवाल आता चंद्रपूरकर विचारत आहेत.

दुसरीकडे, शहरात जरी प्रशासनाची पोलखोल झाली असली, तरी ग्रामीण भागातून मात्र, सुखद चित्र समोर आले आहे. या पावसामुळे गेल्या अनेक दिवसांपासून चातकासारखी वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. उकाड्याने हैराण झालेल्या धरणीमातेला शेवटी विसावा मिळाला असून, ग्रामीण भागात पेरणीच्या कामांना आता वेग येणार आहे. त्यामुळे हा पाऊस चंद्रपूर शहरासाठी डोकेदुखी ठरला असला, तरी ग्रामीण भागातील बळीराजासाठी मात्र वरगान ठरला आहे.

## यशवाडी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना,
## मुख्यमंत्री सहायता निधीतून २५ लाखांची मदत तातडीने मंजूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, परभणी :** मानवत तालुक्यातील यशवाडी येथील श्री हनुमान मंदिर, येथे २० जून रोजी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. मंदिराच्या गाभाऱ्यासमोरील सभा मंडप कोसळून पाच जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर मुख्यमंत्री सहायता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये या प्रमाणे एकूण २५ लाख रुपये आर्थिक मदत तातडीने मंजूर करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री सचिवालयाने जिल्हाधिकारी, परभणी यांना पाठविलेल्या पत्रानुसार या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या संतोष गडदे, आकाश सुरजोसे, नुमेश अगरवाल, सूरज कोपरटकर, श्रीकृष्ण गवारे यांच्या कायदेशीर वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर मदतीची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीच्या खात्यातून स्टेट बँक ऑफ इंडिया, परभणी येथील जिल्हाधिकारी यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली असून, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित वारसांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या की, यशवाडी येथील दुर्घटना अत्यंत वेदनादायी असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची तातडीने दखल घेत मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये अर्थसहाय्य तातडीने मंजूर केले आहे. शासन संकटग्रस्त कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

## बुलढाणा शहरात २८ जूनला पल्स पोलिओ लसीकरण मोहीम



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, बुलढाणा :** राष्ट्रीय पल्स पोलिओ कार्यक्रमांतर्गत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी बुलढाणा शहरात विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्यात येणार आहे. मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी बुलढाणा शहर परिसरात एकूण ३६ पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आले आहेत. पालकांनी आपल्या परिसरातील जवळच्या बूथवर बालकांना घेऊन जाऊन पोलिओचा डोस पाजावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांनी केले आहे. पोलिओसारख्या गंभीर आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत लसीकरण पोहोचणे आवश्यक असल्याने कोणतेही मूल या मोहिमेपासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. आरोग्य विभागाच्या या राष्ट्रीय उपक्रमात पालकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या पाल्यांना पोलिओ प्रतिबंधक डोस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पंढरीच्या श्री विठ्ठल मूर्तीवर रासायनिक लेपन नकोच : उच्च न्यायालय

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** पंढरीच्या श्री विठ्ठल मूर्तीवर रासायनिक लेपन (केमिकल कोटिंग) करण्याच्या मंदिर समितीच्या निर्णयाविरोधात बाळासाहेब डिंगरे व गणेश लंके यांनी दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाने महत्वपूर्ण आदेश दिला आहे. या न्यायालयीन लढ्याला यश मिळाल्याने २३ व २४ जून रोजी श्री विठ्ठल मंदिर दर्शनासाठी नियमित खुले राहणार आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने भारतीय पुरातत्त्व विभागाच्या सल्ल्यानुसार मूर्तीची झीज रोखण्यासाठी पाचव्यांदा रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता. याआधी १९८८, २००५, २०१२ आणि २०२० अशा चार वेळा ही प्रक्रिया करण्यात आली होती. २४ जुलै २०२० रोजी झालेल्या चौथ्या प्रक्रियेची दुरुस्ती २३ जून २०२३ रोजी करण्यात आली होती.



वारकरी संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला होता. मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी सांगितले की, कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात बेहडा, दुर्वा अर्क आणि बिब्ब्याच्या तेलासारख्या सेंद्रीय घटकांचा वापर करून नैसर्गिक वज्रलेप प्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली होती. वारकऱ्यांची शंका आहे की, वारंवार होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेमुळे मूर्ती संवर्धनाच्या दृष्टीने घातक परिणाम होतात.

न्यायालयाचा आदेश व विजयया पार्श्वभूमीवर बाळासाहेब डिंगरे व गणेश लंके यांनी रासायनिक लेपनाला विरोध करत न्यायालयीन लढा दिला. त्यांच्या याचिकेवर न्यायालयाने रासायनिक लेपनाला स्थगिती देणारा महत्वपूर्ण आदेश दिला आहे. त्यामुळे आषाढी वारीच्या तोंडावर २३ व २४ जून रोजी मंदिर दर्शनासाठी बंद न ठेवता नियमित खुले राहणार आहे.

विठुरायाच्या मूर्तीवर रसायनांचा स्पर्श नको ही वारकऱ्यांची मागणी होती. न्यायालयाच्या निर्णयामुळे लाखो वारकरी व विठ्ठलभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मंदिर महासंघ व वारकरी संप्रदायाने नैसर्गिक वज्रलेप पद्धतीचा अवलंब करावा, अशी मागणी केली आहे.

## एकल महिला धोरणासाठी ३० जूनला जिल्हास्तरीय बैठक; सूचना व अभिप्राय मागविले

**दि.२२, बुलढाणा :** राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र आणि व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करत आहे. या धोरणाला अधिक परिणामकारक व लोकाभिमुख स्वरूप देण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने ३० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत एकल महिलांच्या समस्या, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांनी या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. धोरणाचा मसुदा तयार करताना केवळ समस्या मांडण्याऐवजी त्यावरील ठोस उपाय, नवीन योजना, विद्यमान योजनांमधील आवश्यक बदल तसेच कायदे किंवा नियमांमधील सुधारणा याबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रस्तावामध्ये संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि त्याचे परिणाम यांचा समावेश असावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी प्रशासनाने ८२०८५८९१९५ हा अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. या क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या नाविन्यपूर्ण सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाच्या मसुदा तयार करताना विचार केला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित घटकांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

## सरसकट कर्जमाफीसाठी आज पारनेरमध्ये जनआक्रोश मोर्चा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी २३ जून रोजी पारनेर तहसील कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत शेतकरी, सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बैठकीत राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाला मिळत नसलेला हमीभाव यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला असल्याची खंत




व्यक्त करण्यात आली. सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

खासदार निलेश लंके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण कायम त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच २३ जून रोजी होणारा जनआक्रोश मोर्चा ऐतिहासिक आणि अभूतपूर्व करण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी मोर्चाच्या नियोजनासंदर्भात विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. गावोगावी जनजागृती करून मोठ्या संख्येने शेतकरी मोर्चात सहभागी होतील, यासाठी कार्यकर्त्यांना सूचना देण्यात आल्या. बैठकीच्या शेवटी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्व संघटनांनी एकत्रितपणे संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे आगामी जनआक्रोश मोर्चाकडे संपूर्ण तालुक्यांचे लक्ष लागले आहे.

अक्षराज



संपादकीय



## अजरामर लोक गायक

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.

प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी त्यांनी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई आणि भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली.

त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जन्मलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले.

प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. २३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंडं देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# विधवा सन्मान : समाजाच्या प्रगल्भतेचा खरा आरसा



**- डॉ.राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

२३ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' म्हणून जगभरात पाळला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून समाजातील अत्यंत संवेदनशील, अनेकदा दुर्लक्षित आणि शांतपणे वेदना सहन करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जीवनातील वास्तवाकडे पाहण्याची एक गंभीर संधी आहे. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकास, औद्योगिकीकरण किंवा तंत्रज्ञानातील प्रगतीने होत नाही, तर त्या समाजात दुर्बल घटकांना मिळणारे सन्मान, सुरक्षा आणि समान संधी यावरून खऱ्या अर्थाने ठरते. या निकषावर पाहिले असता विधवा स्त्रियांची स्थिती हा समाजाच्या अंतर्मनाचा आरसा ठरतो. हा आरसा आपल्याला केवळ प्रगती दाखवत नाही, तर अनेक ठिकाणी असलेल्या असमानता, परंपरागत मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेचेही स्पष्ट प्रतिबिंब दाखवतो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे.

विधवा स्त्रीचे जीवन हे अचानक कोसळलेल्या भावनिक व सामाजिक भूकंपासारखे असते. विवाहानंतर मिळालेला सहजीवनाचा आधार, भावनिक सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक ओळख पतीच्या निधनानंतर एका क्षणात बदलून जाते. त्या क्षणी तिच्या जीवनात केवळ दुःख नसते, तर अनिश्चितता, भीती, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांचा मोठा डोंगर उभा राहतो. मुलांचे संगोपन, घराचा आर्थिक भार, समाजाचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न हे सर्व एकाच वेळी तिच्यासमोर उभे राहते. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगण्याचा प्रयत्न करतात. त्या संघर्षाची किंमत मात्र समाज अनेकदा ओळखत नाही. हा अदृश्य संघर्ष या प्रश्नाची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रीचे स्थान अनेक बदलांमधून गेले आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात स्त्रीला शिक्षण, संपत्ती आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग होता. परंतु कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे तिच्यावर बंधने वाढत गेली. विशेषतः मध्ययुगीन काळात सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहावर बंदी आणि कठोर सामाजिक रूढी यांनी स्त्रीचे जीवन अधिक कठीण केले. आधुनिक भारतात कायद्याच्या माध्यमातून या अमानुष प्रथांवर बंदी घालण्यात आली असली तरी समाजातील मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. आजही काही भागांमध्ये विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढींच्या चौकटीत अडकलेला दिसतो. त्यामुळे कायदेशीर प्रगती आणि सामाजिक मानसिकता यामध्ये एक मोठी दरी आजही अस्तित्वात आहे.

विधवा स्त्रियांच्या जीवनातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे आर्थिक असुरक्षितता. पतीच्या निधनानंतर कुटुंबाचा आर्थिक आधार अचानक नाहीसा होतो किंवा अत्यंत कमी होतो. ज्या स्त्रिया गृहिणी असतात, त्यांच्याकडे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे त्या पूर्णपणे कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. हे अवलंबित्व अनेकदा त्यांच्या स्वाभिमानावर परिणाम करते.



काही वेळा त्यांचा आर्थिक निर्णयांवर अधिकारही कमी होतो. वारसा हक्क, मालमत्ता, बँक व्यवहार आणि सरकारी लाभ याबाबत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कायद्याने अधिकार दिले असले तरी प्रत्यक्ष जीवनात माहितीचा अभाव, कागदपत्रांची गुंतागुंत आणि सामाजिक दबाव यामुळे त्या अधिकारांचा उपयोग अनेकदा होत नाही. परिणामी आर्थिक स्वावलंबनाचा अभाव त्यांना दीर्घकाळ असुरक्षित ठेवतो.

सामाजिक दृष्टिकोन हा या प्रश्नाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. समाजात अजूनही काही ठिकाणी विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा नसून उपेक्षेचा आहे. तिला शुभकार्यांपासून दूर ठेवणे, तिच्या वेशभूषेवर निर्बंध घालणे, तिच्या उपस्थितीला अशुभ मानणे किंवा तिला दुय्यम स्थान देणे अशा अनेक प्रथा काही भागांमध्ये आजही दिसतात. या प्रथा केवळ अंधश्रद्धा नसून त्या मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणाऱ्या आहेत. स्त्रीचे मूल्य तिच्या वैवाहिक स्थितीवर ठरवणे ही मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण करते. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच असतो जिथे प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अस्तित्वावर सन्मान दिला जातो.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत संवेदनशील असते. जीवनसाथीचा मृत्यू हा एक गंभीर भावनिक आघात असतो. त्या आघातातून सावरण्यासाठी वेळ, आधार आणि सहानुभूती आवश्यक असते. परंतु सामाजिक अपेक्षा इतक्या तीव्र असतात की स्त्रीला स्वतःच्या दुःखासाठीही वेळ मिळत नाही. तिला लगेचच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी लागते आणि समाजाच्या नियमांनुसार वागावे लागते. या प्रक्रियेत तिच्या भावनांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. एकटेपणा, नैराश्य, भविष्याची अनिश्चितता आणि भीती या भावना तिच्या मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करतात. मानसिक आरोग्याचे प्रश्न अनेकदा दिसत नाहीत, परंतु त्यांचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.

शिक्षणाचा अभाव आणि कायदेशीर जागरूकतेचा अभाव हे देखील मोठे अडथळे आहेत. ग्रामीण भागात अनेक स्त्रियांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नसते. वारसा हक्क, पुनर्विवाहाचा अधिकार, सरकारी योजना, पेन्शन सुविधा आणि सामाजिक सुरक्षा योजना याबाबत अज्ञान असल्यामुळे त्या अनेक लाभांपासून वंचित राहतात. केवळ कायदे तयार करून उपयोग नाही; त्यांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कायदेशीर साक्षरता ही सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. माहितीशिवाय अधिकार निरर्थक ठरतात.

सरकारने विधवा स्त्रियांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. विधवा पेन्शन योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, स्वयंरोजगार योजना आणि पुनर्वसन कार्यक्रम यांचा उद्देश त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. मात्र या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचताना अनेक अडचणी येतात. कागदपत्रांची गुंतागुंत, प्रशासकीय विलंब, माहितीचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे अनेक पात्र स्त्रिया या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ, पारदर्शक आणि मानवी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे.

पुनर्विवाहाचा मुद्दा समाजात अजूनही संवेदनशील मानला जातो. काही ठिकाणी पुनर्विवाह स्वीकारला जातो, तर काही ठिकाणी त्याला विरोध केला जातो. परंतु पुनर्विवाह हा स्त्रीच्या जीवनातील नवीन सुरुवातीचा मार्ग ठरू शकतो. तो तिच्या भावनिक स्थैर्यासाठी, सामाजिक स्वीकारासाठी आणि आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा ठरतो. स्त्रीचे जीवन केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसते, तर ते सतत पुढे जाणारे असते. त्यामुळे पुनर्विवाहाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक मानवी, सकारात्मक आणि स्वीकारशील असणे आवश्यक आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील परिस्थितीत मोठा फरक दिसून येतो. शहरी भागात शिक्षण, रोजगार आणि जागरूकता अधिक असल्यामुळे विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण तुलनेने चांगले झालेले दिसते. परंतु ग्रामीण भागात परंपरा, अंधश्रद्धा आणि सामाजिक दबाव अधिक असल्यामुळे परिस्थिती अधिक कठीण आहे. तरीही स्वयंसेवी संस्था, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू सकारात्मक बदल घडताना दिसत आहे. हा बदल मंद असला तरी दिशादर्शक आहे.

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा सर्वात मजबूत पाया आहे. शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास विधवा स्त्रिया आत्मनिर्भर होऊ शकतात. लघुउद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, सेवा क्षेत्र, लघु व्यापार आणि डिजिटल कौशल्ये यामधून त्या स्वतःचे जीवन उभे करू शकतात. आर्थिक स्वावलंबन केवळ उत्पन्न देत नाही, तर आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता वाढवते.

समाजाच्या मानसिकतेत बदल घडवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. कायदे आणि योजना असूनही जोपर्यंत समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत खरे परिवर्तन शक्य नाही. विधवा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दयेचा नसून समानतेचा असला पाहिजे. तिच्या अस्तित्वाला दुय्यम मानणे हे सामाजिक अन्यायाचे प्रतीक आहे. हा बदल केवळ नियमांनी नाही तर विचारांनी घडतो.

माध्यमांची भूमिका या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी विधवा स्त्रियांच्या प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकणे आवश्यक आहे. त्यांच्या संघर्षकथा, यशोगाथा आणि प्रेरणादायी उदाहरणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही निर्णायक आहे. शालेय स्तरावर लिंगभाव समानता, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचे शिक्षण दिल्यास पुढील पिढी अधिक संवेदनशील बनेल.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही विधवा स्त्रियांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले जात आहे. अनेक देशांमध्ये त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरणे राबवली जात आहेत. लिंग समानता, गरिबी निर्मूलन आणि सामाजिक न्याय ही जागतिक उद्दिष्टे या प्रश्नाशी जोडलेली आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ स्थानिक नसून जागतिक आहे.

विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण हे केवळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. एक सक्षम स्त्री कुटुंबाला स्थैर्य देते, पुढील पिढी घडवते आणि समाजाला दिशा देते. त्यामुळे त्यांच्या विकासात गुंतवणूक करणे हे समाजाच्या भविष्यात गुंतवणुकीसारखे आहे.

शेवटी असे म्हणता येईल की आंतरराष्ट्रीय विधवा दिन हा केवळ स्मरणाचा नाही तर आत्मपरीक्षणाचा आणि कृतीचा दिवस आहे. समाजाने स्वतःला विचारले पाहिजे की आपण विधवा स्त्रियांना कोणते स्थान देतो, त्यांना किती सन्मान देतो आणि त्यांच्या हक्कांसाठी किती सक्रिय आहोत. सहानुभूती पुरेशी नाही; सन्मान, समानता आणि सक्षमीकरण हीच खरी गरज आहे. विधवा स्त्री ही दयेची नव्हे तर अधिकारांची, आत्मनिर्भरतेची आणि सन्मानाची प्रतीक आहे ही जाणीव समाजात दृढ करणे हीच या दिनाची खरी प्रेरणा आहे.

## शर्करा

घोडा बाजार आता
सरकार मान्य करा
ताण कशास घ्यावा
मार्ग हा सर्वांत बरा

निवडणूकीचा उगा
चाले कसलानखरा
व्यथा कथा तशीचं
ठसठसे भागदुखरा

झटपट मिळो सत्ता
नकोसा पर्याय खरा
मोत्याचेदाणे टाकून
चळावा त्या पाखरा

चांदीच्या सिंहासना
मढवा सुवर्ण मखरा
तुडवपायीनितीमत्ता
स्पर्श करता शिखरा

जड जड बॅगा पाहून
बुध्दीस येती चकरा
माघार घेण्याकरिता
कितीदा मारा चकरा

योग्यवेळी कापायचे
शोधून ठेवला बकरा
प्रचारा करता फुकट
फिरवे कशासलेकरा

मिडीयाहाताशी धरा
लावून द्याव्या टकरा
भळभळणारी जख्म
अधून मधूनि टोकरा

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# निपाणी व्हाया मांगूर, बोरगांव पंढरपूर बस सुरु करावी

निपाणी व्हाया मांगूर, बोरगांव, कुरुंदवाड, मिरज पंढरपूर बस सुरु करावी अशी या भागातील समस्त विठ्ठल भक्तातून मागणी जोर धरु लागली आहे वर्षातून आषाढी, कार्तिकी, माघ आणि चैत्र वारीसह आधून - मधून भक्तगण पंढरपूरला विठलाच्या दर्शनासाठी जात असतात. मात्र या मार्गावर थेट बस नसल्याने विठ्ठल भक्तांची मोठी गैरसोय होत आहे.

त्यासाठी निपाणी आगारातून दिवसातून किमान दोन फेऱ्या निपाणी व्हाया मांगूर, कारदगा, बोरगांव, कुरुंदवाड, शिरोळ, जयसिंगपूर, मिरज, पंढरपूर बस सेवा सुरु करावी अशी भक्तासह जनतेतून मागणी होत आहे. दिवसेंदिवस या भागातून विठ्ठल भक्तांची संख्या वाढत आहे तसेच या मार्गावर नृसिंहवाडी येथील श्रीक्षेत्र दत्त देवस्थान, शिरोळ तालुक्याचे



ठिकाण, दत्त साखर कारखाना, जयसिंगपूर - मिरज येथे दवाखाना तसेच या भागामध्ये असलेले उच्च शैक्षणिक संकुले यामुळे या भागातील बरेच विद्यार्थी, प्रवासी, भक्त, नोकरदार प्रवास करत असतात या मार्गावर थेट बस सेवा सुरु झाल्यास सर्वच स्तरातील प्रवासी वर्गाला याचा लाभ होणार आहे.

विशेष करुन वयोवृद्ध भक्तांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांना लांब पाल्यावर जावून सतत बस बदलून जाणे अडचणीचे ठरत आहे. या भागातून थेट पंढरपूरला जाण्यासाठी बस सुविधा झाली तर त्यांना सोयीचे होवून वेळ व पैसा वाचणार आहे. या भागामध्ये दत्त साखर कारखान्याचे मोठ्या प्रमाणात सभासद असल्यामुळे कारखान्याच्या विविध कामासाठी वरचेवर शिरोळला ये - जा करावी लागते, बस सेवा सुरु झाल्यामुळे भक्तांना पंढरपूरला कधीही जाता येते त्यासाठी या भागातील जनप्रतिनिधींनी आणि आगार प्रमुखांनी गांभीर्याने लक्ष देवून समस्त विठ्ठल भक्तांसह प्रवासी वर्गाला दिलासा द्यावा अशी मागणी जोर धरली आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाराष्ट्र विद्यालय येथे योग दिन उत्साहात साजरा




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** शारीरिक आणि मानसिक स्वास्थासाठी योगाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी २१ जून रोजी महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगतज्ञ् रंगराव ठाकरे व ललिता वानखेडे यांनी उपस्थित राहून प्राणायाम आणि ध्यान यामुळे तणाव कमी होतो, मन शांत होते, एकाग्रता वाढते. याप्रकारचे महत्व विषद करीत योगाभ्यास करून घेतला. शारीरिक शिक्षक धैर्यशील सुटे यांनी कार्यक्रमाचे संचालन करीत शारीरिक व्यायामाचे महत्व स्पष्ट केले व सर्वांना सुलभ होईल असे व्यायाम करून घेतले. आजच्या या खास दिवशी शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर यांनी निरोगी आरोग्याचा संकल्प विद्यार्थ्यांमार्फत करून योग म्हणजे केवळ व्यायाम नाही, तर शरीर, मन, आणि आत्मा यांचा संगम आहे. अशा प्रकारचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. मोठ्या प्रमाणात साजरा होणाऱ्या या कार्यक्रमाला शाळेचे पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, श्यामली चानीकर, अभय पुल्लीवार तसेच सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पारनेर तालुक्यात तातडीने चारा छावण्या सुरू करा

## राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांची प्रशासनाकडे मागणी



पारनेर तालुक्यात अपुऱ्या पावसामुळे चारा व पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. दुग्ध व्यवसायावर अवलंबून असलेला शेतकरी आज संकटात असून, महागड्या चाऱ्यामुळे त्याचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून टाकळी ढोकेश्वर गटासह संपूर्ण तालुक्यात तातडीने शासनमान्य चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पशुधनाला तात्काळ आधार द्यावा, हीच आमची आग्रही मागणी आहे.
**- अमोल उगले (राष्ट्रवादीचे नेते टाकळी ढोकेश्वर गट)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात यंदा अपुऱ्या पावसामुळे आणि वाढत्या उष्णतेमुळे तीव्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यात तातडीने शासनमान्य चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अमोल उगले यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले.

तालुक्यात हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध नसल्याने पशुपालक मोठे संकटात सापडले आहेत. शेतीपूरक असलेला दुग्ध व्यवसाय हा येथील ग्रामीण कुटुंबांचा प्रमुख आधार आहे. मात्र, चाऱ्याची तीव्र टंचाई, पाण्याची कमतरता आणि बाजारातील वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अनेक शेतकऱ्यांना दूरवरून महागडा चारा खरेदी करावा लागत असून, जनावरांचे हाल थांबवण्यासाठी छावण्यांमध्ये पुरेसा चारा आणि पाण्याची सोय करणे अत्यंत गरजेचे आहे.

टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील आणि संपूर्ण तालुक्यातील सद्यस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने तात्काळ शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी तालुक्यातील अनेक प्रमुख पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये भोंद्रे गावचे सरपंच अभिजीत झावरे, वारणवाडीचे सरपंच संजय काशीद, माजी सरपंच अनिल तांबडे, सामाजिक कार्यकर्ते अशोक खैरे, निलेश पवार, युवराज पाटील खिलारी, सुरेश झावरे, ग्राम पंचायत सदस्य डॉ. आकाश झावरे, पियुष कोकाटे, सचिन वाफारे, मयूर आंधळे, विवेक शिंदे, आणि देसवडे येथील संपत फटांगरे आदींचा समावेश होता.

प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा ही यावेळी कार्यकर्त्यांनी दिला.

## ठाण्यात पुन्हा ४८ तास पाणीबाणी; कळवा, मुंब्रा, दिवा होणार प्रभावित




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, ठाणे :** यंदाचा कडक उन्हाळा, लांबलेला पाऊस आणि अशातच पुन्हा पुन्हा होणारी पाणी कपात यामुळे ठाणेकर नागरिक पूर्णतः हवालदिल झाले आहेत.तलावांचे शहर असलेल्या ठाणे शहरात सध्या सर्वत्र पाणी टंचाई निर्माण होत असल्यामुळे अनेक भागांमध्ये पाणी कपात करण्यात येत आहे. पुण्यामध्ये तर १५ जूनपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कळवा, मुंब्रा, दिवा आणि माजिवडा-मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समिती मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यात एलनिनो व आयओडीच्या प्रभावामुळे या वर्षी पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरात अनेक ठिकाण पाणीकपात करण्याच निर्णय घेण्यात येणार आहे.

जलसंपदा विभागाबरोबर १९ जून रोजी आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेण्यात आल्या होत्या. त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आगामी कालावधीत पाणी टंचाईची परिस्थिती उद्भवू नये. म्हणून पाणी कपात करण्याचे ठरले आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी, जांभूळ व शहाड जलशुद्धीकरण केंद्र शहाड येथून होणारा पाणीपुरवठा आज मंगळवार २३ जून रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून ते गुरूवार दिनांक २५ जून रोजी रात्री १२.०० वाजेपर्यत म्हणजेच एकूण ४८ तास बंद राहील.

दरम्यान या शटडाऊनचा परिणाम ठाणे महानगरपालिके अंतर्गत कळवा प्रभाग समितीतील सर्व भाग, दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता),वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. २, नेहरूनगर तसेच मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत कोलशेत खालचा गाव या भागांवर होणार आहे. त्यामुळे या सर्व ठिकाणी ४८ तासांसाठी पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा पुन्हा एकदा सुरू झाल्यानंतर पुढील काही दिवस कमी दाबाने पुरवठा होईल अशी माहिती महानगरपालिकेने दिली आहे. ठाणेकर नागरिकांनी या ४८ तासांदरम्यान पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# योग आणि व प्राणायाम निरोगी जीवनाची गुरुकिल्ली फायदेशीर - ॲड.खिलारी

## ढोकेश्वर विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** आजच्या धकाधकीच्या आणि तणावाच्या युगात योग आणि प्राणायाम ही मानवाला मिळालेली सर्वात मोठी संजीवनी आहे.

नियमित योगासने केल्यामुळे शरिराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायुंना बळकटी मिळते. शारीरिक सुदृढतेबरोबर मानसिक प्रसन्नता मिळवण्यासाठी योग अत्यंत प्रभावी ठरते. योग ही तरूताईची एकाग्रता आणि कार्यक्षमता वाढवणारी गुरुकिल्ली आहे असे प्रतिपादन पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी यांनी केले.

श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २१ जून हा जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. खिलारी बोलत होते.

योगदिनाच्या निमित्ताने विद्यालयात माजी सूबेदार आणि टाकळी ढोकेश्वर परिसरातील योगाचार्य मेजर गणपत ठाणगे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले.

यावेळी योगासने करता-करता विद्यार्थ्यांना योगाचे महत्व देखील समजावून सांगितले. मेजर ठाणगे म्हणाले की, नियमित योगामुळे तुम्ही नेहमी तंदुरुस्त व निरोगी रहाल. यावेळी महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेची पूजा करून योगा व प्राणायमाला सुरुवात केली.

योग दिनाच्या पूर्व संध्येला शनिवारी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या उज्वला दीदी यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या बोलताना म्हणाल्या की, आपण सात्विक अन्नग्रहण केले पाहिजे. व्यसनाला दूर ठेवले पाहिजे. दररोज ओमं ध्वनी म्हटल्यास सकारात्मक व्यक्तिमत्व घडते. एकाग्रता वाढते. यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देखील देण्यात आली

यावेळी प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, समन्वयक अशोक गांगड. रवींद्र मते, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, माजी प्राचार्य प्रकाश इघे, भाऊसाहेब हिंगडे, राजेंद्र ढोणे, पोपट जगदाळे , अशोक वाघ, सचिन महानवर, आतिष झावरे, सुनिल झावरे, मंगेश पोपळघट, नारायण शेळके, निलेश जासूद, नितीन ढोकळे, श्रीरंग धामणे, संदीप महाडूळे, विष्णू भद्रे, निलम खिलारी, सोनल रोहोकले, सुरेखा ठाणगे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, पवन कुटे, भास्करराव झावरे, दीपक गुंदेचा, साहिल गुंदेचा, छाया माता, ढोकेश्वर वसतिगृहाचे अधीक्षक बाळासाहेब रोकडे, धोंडिभाऊ झावरे, नारायण हरेल, अमोल गोरे, घोडके, इत्यादी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह. भ. प. रविंद्र महाराज मते यांनी केले तर आभार भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

## मौजे बाभूळगाव येथे खेत बचाव अभियान संपन्न



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२२, राहुरी (अहिल्यानगर) :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्पाच्या वतीने खेत बचाव अभियान आणि संतुलित खत वापर जागरूकता अभियानांतर्गत दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी चारा पिकांचे तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम मौजे बाभूळगाव ता.राहुरी येथे संपन्न झाला. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय यांचे सूचनेनुसार व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली आणि संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्पाचे चारा पैदासकार डॉ.कैलास भोईटे होते. याप्रसंगी बाबुळगावचे सरपंच गोरख गिऱ्हे,चारापिके संशोधन प्रकल्पाचे वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ.योगेश सैंदाणे, श्रीगणेश दूध डेअरीचे संचालक एकनाथ पाटोळे व वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ.बी.जी.राठोड उपस्थित होते.

यावेळी डॉ.कैलास भोईटे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की, मातीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय, जैविक व हिरवळीच्या खतांचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. यामुळे जमिनीचा कर्ब वाढून जमीन सुपीक होईल. याप्रसंगी झालेल्या तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ.योगेश सैंदाणे यांनी चारा पिकांमध्ये जैविक कीटकनाशकांचा कशाप्रकारे वापर करावा व त्यामुळे पशूंचे आरोग्य कसे अबाधित ठेवता येईल याविषयी मार्गदर्शन केले. डॉ.बी.जी.राठोड यांनी मातीची सुपीकता वाढविण्यासाठी जमिनीत काय काय उपाययोजना कराव्यात व मातीचा नमुना कशा प्रकारे घ्यावा. याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. योगेश सैंदाणे यांनी केले. यावेळी त्यांनी कृषी तंत्रज्ञान घरोघरी, समृद्धी येईल गावोगावी या संकल्पनेतून विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जात असल्याचे सांगितले. तसेच शेतकऱ्यांनी संतुलित खत वापर जनजागृती अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चारापिके संशोधन प्रकल्पातील सुहास भालेराव, संदीप ढगे, संजय पवार, समर्थ दुबळे व अक्षय पवार यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमासाठी जालिंदर वाघमोडे, सुजित पाटोळे, अशोक पाटोळे, मच्छिंद्र वाघमोडे, अनिल थोरात तसेच बाभुळगाव, वरवंडी व खडकवाडी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जत तालुक्यातील वीज प्रश्नांवर नागरिकांचा एल्गार

### १५ दिवसांत सुधारणा न झाल्यास आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२२, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील वीज समस्यांबाबत आयोजित बैठकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. स्मार्ट मीटर, वारंवार होणारे वीज खंडित, वाढीव वीज बिले तसेच वीज पुरवठ्याशी संबंधित विविध समस्यांवर नागरिकांनी आपली मते मांडली. समितीच्या प्रयत्नांमुळे ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या आंदोलनानंतर तालुक्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या वीज विकास कामांना मंजुरी मिळाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. त्यामध्ये अंदाजे १०० कोटी रुपयांच्या विविध कामांचा समावेश असून त्यापैकी ६५ कोटी रुपयांची कामे मंजूर होऊन टेंडर प्रक्रियेत आहेत, तर ३७ कोटी रुपयांची कामे आरडीएसएस योजनेअंतर्गत मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.याशिवाय कर्जत शहराच्या १२५ कोटी रुपयांच्या भुयारी विद्युतीकरणाचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत असून कर्जत एक्सप्रेस फीडरचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती देण्यात आली.

या बैठकीत रंजन दातार यांनी नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. तसेच मंजूर झालेल्या विविध विकासकामांची माहिती देत ही कामे पूर्ण झाल्यानंतर पुढील २० वर्षांसाठी तालुक्यातील वीज समस्यांवर मोठ्या प्रमाणात उपाय होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ॲड. कैलास मोरे यांनी नागरिकांनी एकजुटीने राहून मंजूर झालेली सर्व कामे पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. तसेच येत्या १५ दिवसांत महावितरणच्या कारभारात अपेक्षित सुधारणा झाली नाही तर व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला. या आंदोलनाला व्यापारी वर्गाचाही पाठिंबा असून आवश्यक असल्यास ‘कर्जत बंद’ची हाक दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सदर बैठकीस डॉक्टर, वकील, व्यापारी, उद्योजक, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे वीज प्रश्नांबाबत जनजागृती आणि संघटित लढ्याला अधिक बळ मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## अभिनव महाविद्यालयाची डिजिटल झेप; अत्याधुनिक क्लासरूम व संगणक प्रयोगशाळेचे लोकार्पण



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२२, कर्जत (अहिल्यानगर) :** अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या अभिनव ज्ञान मंदिर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने आधुनिक शिक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम व संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन शनिवारी उत्साहात केले. रोटरी क्लब बॉम्बे पवई यांच्या सहकार्याने साकारलेल्या या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे पदवीच्या शिक्षणासह महाविद्यालयात आता मॅनेजमेंटचे शिक्षण सुद्धा विद्यार्थी घेत आहेत. त्यामुळे या डिजिटल लॅब चा फायदा विद्यार्थ्यांना नक्कीच होणार आहे.

कार्यक्रमाला रोटरी क्लब बॉम्बे पवईच्या अध्यक्षा रोटेरियन अंजू अहलुवालिया, प्रकल्प संचालिका रोटेरियन अमिता वोहरा, निधी समन्वयक रोटेरियन आर. वनमाली, संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य, उपाध्यक्ष अरुण धारप, सचिव नंदकुमार मनेर, सहसचिव अनिल जोशी, खजिनदार पद्माकर गांगल, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य शंकर शेलार, दिनानाथ पुराणिक, डॉ.माधवी ठाकूरदेसाई, डॉ.फडके, संजीव दातार, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रवीण घोडविंदे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बी.एम.एस. विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. गणेश वैद्य यांच्या हस्ते नारळ फोडून कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर अंजू अहलुवालिया यांच्या हस्ते फीत कापून डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले.

शारदा मंदिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संस्था गीत सादर केले. प्राचार्य डॉ. प्रवीण घोडविंदे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली, तर अमिता वोहरा यांनी रोटरी क्लबच्या सहकार्य मागील उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षीय भाषणात गणेश वैद्य यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संस्थेची बांधिलकी अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्रा. प्राचीता पालकर यांनी केले.

# जलसंधारण चळवळ ग्रामविकासासाठी आवश्यक: आ. दाते

## ‘आम्ही टाकळीकर’ च्या जलसंधारण कामाची पाहणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर)** : पाण्याचे नियोजन करणारे गावच भविष्यात प्रगती साधणार आहेत. यासाठी प्रत्येक गावात जलसंधारण चळवळ वाढीस लागणे आवश्यक आहे. शासकीय यंत्रणेसोबत सामाजिक संस्था यात सहभागी व्हायला हव्यात. त्यामुळेच आम्ही टाकळीकरचा जलसंधारण कामातील पुढाकार प्रशसनीय आहे, असे प्रतिपादन आमदार काशीनाथ दाते यांनी केले.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशन, ग्रामपंचायत व विविध संस्थांच्या माध्यमातून सुरू केलेल्या निवडुंगेवाडी तलाव खोलीकरण जलसंधारण कामास आ. दाते यांनी आज भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ज्येष्ठ पत्रकार चाँद शेख यांनी जलसंधारण कामाची माहिती दिली. एक महिन्यापासून हे काम सुरू असून पावसाळा सुरू होईपर्यंत हे काम सुरू राहणार आहे. तसेच पुढील वर्षीही तलाव खोलीकरण उर्वरित काम पूर्ण केले जाणार आहे.

आ. दाते म्हणाले, जागतिक हवामानातील बदलामुळे पाण्याची समस्या दिवसेदिवस बिकट होत चालली आहे. त्यामुळे राज्य शासन जलसंधारण कामांना प्राधान्य देत आहे. गावच्या विकासाचे व्हिजन ठेवताना पाण्याचे व्हिजन असणे आवश्यक आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे’, भगवंत थोपटे गुरुजी, सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन बबनराव पायमोडे, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ . भाऊसाहेब खिलारी, आम्ही टाकळीकरचे स्थानिक समन्वयक संतोष सोनावळे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, गंगाधर निवडुंगे, अक्षय गोरडे, बापूसाहेब रांधवण, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, आबा धुमाळ, संपत धुमाळ, अंकुश धुमाळ, संकेत थोपटे, महादू झावरे, दीपक ढूस , नितीन धुमाळ.महेश धुमाळ, पोपट धुमाळ, रविंद्र पायमोडे, जालिंदर बांडे, प्रवीण थोपटे, विष्णू निवडुंगे, पवन निवडुंगे, राहुल धुमाळ, सतीश निवडुंगे शहाजी पायमोडे, निलेश चव्हाण,गणेश चव्हाण, विकास सोनुळे विविध संस्थांचे पदाधिकारी, धुमाळ वस्ती व निवडुंगेवाडी येथील युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**५० लाखांचा निधी आधीच मंजूर**

यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी विविध विकास कामांची मागणी करताना टाकळी ढोकेश्वर ते निवडुंगेवाडी रस्त्याच्या कामाची मागणी केली. त्यावर आमदार दाते यांनी मी येथे येण्या आधीच या रस्त्यासाठी ५० लाखांचा निधी राज्य शासनाच्या माध्यमातून मंजूर केले असून आणखी निधीची गरज पडल्यास तोही उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगताच ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले.

# थोडक्यात

## बोरीच्या जि. प. शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२१, बोरी** : माणसाचे स्वतःच्या साधनांवर आणि वस्तूंवर जेवढे लक्ष असते, त्या तुलनेत स्वतःच्या शरीराकडे नसते. त्यामुळे प्रत्येकाने आरोग्याकडे लक्ष देणे ही काळाची गरज बनली आहे. शरीराच्या अंतर्गत शुद्धीसाठी योग हाच एकमेव रामबाण उपाय आहे, त्यामुळे दैनंदिन जीवनात योगाचा अवलंब करा, असा संदेश योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी केले. जिंतूर तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद शाळा, आदर्श बहुउद्देशीय प्रतिष्ठान व ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते.

जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित या सामूहिक योग शिबिराच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण राजभन होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख मोहम्मद शफी, वैद्यकीय अधिकारी डॉ.रमेश गबाळे, मुख्याध्यापक ए. व्ही. गोरे आणि नईमा खान यांची उपस्थिती होती.

या शिबिरात योग प्रशिक्षक गजानन चौधरी यांनी उपस्थितांना योग क्रियांचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. तसेच वृद्ध नागरिकांसाठी उपयुक्त प्राणायाम व सोपी योगासने सांगितली. कार्यक्रमाची सुरुवात पंडित दाभाडे यांच्या प्रार्थनेने झाली, तर उमेश बेंबळगे यांनी शांतीपाठ घेतला. या यशस्वी उपक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिरीष बोरुळे यांनी केले. या शिबिरात शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, नियमित योग वर्गाचे साधक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जावली बँकेची ५३ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

## २१०० कोटींच्या व्यवसायाचे उद्दिष्ट, आगामी निवडणुकीची रंगली चर्चा

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२१, मुंबई** : दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२१) दादर येथील डिसिल्व्हा हायस्कूलमध्ये उत्साहपूर्ण, मनमोकळ्या आणि तितक्याच रंजक वातावरणात संपन्न झाली. बँकेच्या उज्ज्वल भविष्यासोबतच पुढील वर्षी होणाऱ्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची चर्चा सभेचे प्रमुख आकर्षण ठरली.

महाराष्ट्राला सहकाराची पंढरी म्हटले जाते, त्याचप्रमाणे जावली, महाबळेश्वर आणि वाई तालुक्यांच्या सहकार क्षेत्रातील ’सहकार पंढरी’ म्हणून दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेकडे पाहिले जाते. जावली तालुक्याची मातृसंस्था म्हणून बँकेला विशेष स्थान प्राप्त आहे.

सभेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) प्रदेशाध्यक्ष व माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे, जावलीचे माजी आमदार सदाभाऊ सपकाळ, सातारा जिल्हा परिषद सदस्य व माजी उपाध्यक्ष वसंतराव मानकुमरे, सातारा जिल्हा बँकेचे संचालक ज्ञानदेव रांजणे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित कदम तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष जयदीप शिंदे यांच्यासह विविध पक्षांतील मान्यवर उपस्थित होते.




अहवाल वर्षात बँकेची आर्थिक कामगिरी भक्कम आणि समाधानकारक राहिल्याने विषयपत्रिकेतील प्रारंभीचे सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. यावेळी बँकेचे अध्यक्ष विक्रम भिलारे, उपाध्यक्ष चंद्रकांत दळवी तसेच संपूर्ण संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे सभासदांनी विशेष कौतुक केले.

बँकेचे अध्यक्ष विक्रम भिलारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेची वर्तमान आर्थिक स्थिती, भविष्यकालीन योजना, सभासदांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा तसेच बँकेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा अभ्यासपूर्ण आढावा घेत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ते जावली बँकेच्या गेल्या अनेक वर्षांतील यशस्वी अध्यक्ष म्हणून ओळखले जातील, अशा भावना उपस्थित मान्यवर आणि सभासदांमधून व्यक्त करण्यात आल्या.

बँकेने चालू आर्थिक वर्षाअखेरीस २१०० कोटी रुपयांच्या व्यवसायाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले असून, हे शिवधनुष्य पेलण्यासाठी संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. बँकेच्या प्रगतीचा वेग कायम राखत नवे विक्रम प्रस्थापित करण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

मात्र, उपविधी आणि पोटनियम दुरुस्तीचा विषय सभेत चांगलाच गाजला. आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संचालक पदासाठी आवश्यक भागभांडवल, ठेव मर्यादा आणि कालावधी यासंदर्भातील प्रस्तावांवर सभासदांमध्ये सविस्तर चर्चा झाली. काही इच्छुकांनी आपापल्या भूमिका ठामपणे मांडल्या, तर अखेरीस वीस हजार भागभांडवल व दोन लाख ठेव ही पात्रता संचालकासाठी राहिल असा सामोपचाराने सर्वानुमते तोडगा काढत ठराव मंजूर करण्यात आला.व्यावसायिक दृष्टीने बँकेचा कार्यक्षेत्र विस्तार गोवा, मध्य प्रदेश या राज्यात होण्यासाठीचा ठरावही यावेळी संमत करण्यात आला.

या चर्चेमुळे आगामी निवडणूक इच्छुकांच्या मोठ्या भाऊगर्दीमुळे चांगलीच रंगणार असल्याचे संकेत सभेतून मिळाले. त्याचबरोबर बँकेच्या भविष्यकालीन वाटचालीवर, सभासद हिताच्या योजना आणि प्रगतीशील धोरणांवरही सकारात्मक चर्चा झाली.

एकूणच, जावली बँकेची ५३ वी वार्षिक सभा ही केवळ वार्षिक आढावा सभा न ठरता, आगामी निवडणुकीची नांदी, २१०० कोटींच्या व्यवसाय उद्दिष्टाचा निर्धार आणि बँकेच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिशादर्शक ठरल्याची भावना उपस्थित सभासदांनी व्यक्त केली.

## लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर** : लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय, चंद्रपूर येथे आज दि. २१ जून २०२६ रविवार ला आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थ्यांनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होत असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. योगाची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके योग तज्ञ सुदेशा कोट्टू मॅडम यानी माहिती दिली. प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून योगाविषयी जनजागृती करत निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांनी व शिक्षक- शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी नियमित योग करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. निरोगी जीवनासाठी नियमित योगाभ्यास करणे महत्वाचे असे मार्गदर्शन केले. योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित करत नियमित योग केल्याने होणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक फायद्यांची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादानी, योगा मार्गदर्शिका सुदेशा कोट्टू, ज्येष्ठ शिक्षक दिपक गावंडे, यांच्यासह शाळेतील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनींची उपस्थिती होती.

# नवी मुंबईतील तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी स्थानके आता मध्य रेल्वेच्या ताब्यात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, नवी मुंबई** : मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे गेली अनेक वर्ष नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. दोन्ही प्राधिकरणे एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने रेल्वे प्रवासी मात्र यात भरडला जात होता. अखेर १५ मे २०२६ रोजी खासदार नरेश म्हस्के यांनी दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणला होता. आता खासदार नरेश म्हस्के यांच्या प्रयत्नांना यश आले असून सिडकोच्या ताब्यातील ३ स्थानके आज २२ जून रोजी मध्य रेल्वेकडे हस्तांतरित झाली आहेत. उर्वरित रेल्वे स्थानकांचेही मध्य रेल्वेकडे लवकरच हस्तांतर होणार असल्याने नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचा प्रवास आता सुखकर होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयाचे प्रवाशांच्या वतीने शिवसैनिकांनी स्वागत करत खासदार नरेश म्हस्के यांचे आभार मानले आहेत. सिडकोच्या ताब्यात असलेल्या वाशी ते बेलापूर आणि खारघर ते खांदेश्वर या स्थानकांसाठीचे देखभाल करार अनुक्रमे २००३ आणि २००८ मध्ये संपले होते. त्यानंतर कोणताही नवा करार झालेला नव्हता. तर ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, बामणडोंगरी, खारकोपर आणि खारघर या स्थानकांसाठी आजतागायत एकही देखभाल करार करण्यात आलेला नव्हता. यामुळे सुविधांअभावी प्रवाशांचे मेगा हाल होत होते. खासदार नरेश म्हस्के यांनी याची गंभीर दाखल घेत मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासन या दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणत १५ मे २०२६ रोजी नवी मुंबईतील शिवसेना पदाधिकाऱ्यांसह छत्रपती शिवाजी महाराज स्थानक येथील मुख्यालयात बैठक घेतली होती. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन येत्या ६ महिन्यात सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके मध्ये रेल्वेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार आज तीन स्थानकांची हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी ही तीन स्थानके अधिकृतपणे रेल्वेच्या ताब्यात हस्तांतरित झाली आहेत. नवी मुंबई परिसरातील रेल्वे स्थानकांच्या दुरवस्थेबाबत आणि तेथील अपुऱ्या प्रवासी सुविधांबाबत खासदार म्हणून नरेश म्हस्के यांनी पदभार स्वीकारल्या पासून प्रवाशांच्या सतत तक्रारी प्राप्त होत होत्या. या समस्यांची दखल खासदार नरेश म्हस्के यांनी घेतली होती. ‘रेल्वे सल्लागार समिती’ चे सदस्य या नात्याने समितीच्या दिल्ली येथे होणाऱ्या बैठकांमध्ये खासदार नरेश म्हस्के यांनी हा विषय वारंवार मांडला होता. स्थानकांची झालेली पडझड, देखभालीचा अभाव आणि सुरक्षेचा प्रश्न यामुळे सामान्य प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. खासदार नरेश म्हस्के यांनी या बाबी निदर्शनास आणून दिल्यानंतर याची गंभीर दखल घेत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला दिले होते. सिडको भवन (बेलापुर) येथे एका बैठकीत सिडको आणि मध्य रेल्वे यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. खासदार नरेश म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत रेल्वे स्थानके हस्तांतरण प्रक्रियेप्रसंगी मध्य रेल्वेच्या वतीने अभिषेक कुमार गुप्ता (IRSE) - DEN/ हर्बर, संतोष गुंजन –ADEN/ जुईनगर, जी.जवाहरलाल –DEE/G/बॉम्बे, संजय चौरसिया – ACM/Bombay डिव्हिसिओन, सिडकोच्या वतीने अशिवन सुषमा अशोक मुंद्रुगल (भा.प्र.से.) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, डॉ. राजा दयानिधी (IAS)– संयुक्त व्यवस्थापकीय संचालक (JMD), सी. पितळे – सहाय्यक अभियंता (Assistant Engineer), शिवसेना बेलापूर जिल्हाप्रमुख किशोर पाटकर, शिवसेना ऐरोली जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अनिकेत म्हात्रे, नगरसेवक मनोज हळदणकर, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, दत्ता घंगाळे, देवकी शिंदे, अजित दुबे, संजीव कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते. आता तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी ही तीन स्थानके अधिकृतपणे रेल्वेच्या ताब्यात हस्तांतरित झाली आहेत. उर्वरित स्थानकांबाबतही प्रक्रिया सुरू असून लवकरच ती पूर्ण होईल. काही अतिरिक्त जागा, ओपन स्पेस आणि त्यांच्या देखभालीसंदर्भातील विषयांवर सिडको आणि रेल्वे यांच्यात चर्चा सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रवाशांना अपेक्षित सुविधा मिळत नव्हत्या.



मात्र आता स्थानके रेल्वेच्या ताब्यात गेल्यानंतर प्रवाशांना अधिक चांगल्या, दर्जेदार आणि सुसज्ज सुविधा मिळतील, असा विश्वास खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केला आहे. प्रवाशांच्या हिताचा हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असून रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, सिडको आणि मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांचे खासदार नरेश म्हस्के यांनी आभार मानले आहेत.

## देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये योग दिन साजरा



**अक्षराज उमेश तबिब**

**दि.२२, मंडणगड (रत्नागिरी)** : मंडणगड तालुक्यातील देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मंडणगड तालुका भाजपा यांची होती.

या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी असलेले भाजपा मंडणगड तालुका अध्यक्ष दत्ताजी महाडिक यांनी आपल्या मनोगत म्हणाले की, आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत निरोगी राहणे हे मोठे आव्हान बनले असून योगासने शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रामचंद्र कापसे यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, आजच्या जीवनशैलीत योगाचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. त्यामुळे योग आता केवळ एक साधना राहिली नसून आरोग्यवर्धन असल्याने त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाबद्दल माहिती देण्यात आली.तसेच आलेले मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी यांनी योगाची प्रात्यक्षिके करून दाखवली.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भाजपा मंडणगड तालुका अध्यक्ष दत्ताजी महाडिक, देव्हारे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रामचंद्र कापसे, शिक्षणप्रेमी अभिजीत देवळेकर, भाजप उत्तर भारतीय सेल रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष रविंद्र मिश्रा, मंडणगड तालुका भाजपा उपाध्यक्ष प्रकाश कंचावडे, भाजपा अध्यात्मिक तालुका प्रकोष्ट प्रभाकर पेंडसे, भाजप शहर अध्यक्ष आनंद नारकर, शिक्षक कुंडलिक यादव, प्रशांत उगले, योगेश कुमार केसरे, दत्तात्रय कदम, चांदणी शिगवण, रोशनी साखरकर सह विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित रसाळ व आभार वैभव पाध्ये यांनी मानले.